(सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगा घरोघरी

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२

दुरध्वनी - (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७

जा.क्र.खरेदी/२०२५/ | दि. ३.११.२०२५

## दरपत्रक नोटीस (Enquiry No. 999)

प्रति,

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**विषय : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्रासाठी भाडेतत्त्वावरील मालवाहतूक सेवा पुरविणे या स्वरुपाच्या कामाची दरपत्रके मागवणेबाबत..**

महोदय,

खरेदी समिती ठराव क्र. पीसी-०५/२०२५-२६/०३, दि. ३०.०८.२०२५ नुसार उपरोक्त विषयान्वये कामाचे दरपत्रके नामांकित मालवाहतूक पुरवठाकारांकडुन सोबत दिलेल्या अटी व शर्तीनुसार मागवण्यात येत आहे.

**कामाचे स्वरूप - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्रासाठी भाडेतत्त्वावरील मालवाहतूक सेवा पुरविणे....**

**अटी व शर्ती -**

१. सदर कामाचा कालावधी कार्यादेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक वर्ष इतक्या कालावधीसाठी असेल,
२. उपरोक्त कामाचे व्यावसायिक दर हे कर रहित असावेत.
३. शासकीय नियमानुसार मूळ दरांवर करांची आकारणी व्हावी.
४. शासकीय नियमानुसार देयकातून कर वजावाटी (TDS), इ. करण्यात येईल.
५. दरपत्रके ही किमान 60 दिवसांसाठी वैध असतील.
६. सेवापुरवठाकाराने तांत्रिक लिफाफा व व्यावसायिक लिफाफा स्वतंत्रपणे भरून सिलबंद करुन ते दोन्ही लिफाफे एका मोठ्या लिफाफ्यात सिलबंद करुन त्यावर "***दरपत्रक नोटीस Enq. No. 999, पुणे विभागीय केंद्रासाठी भाडेतत्त्वावरील मालवाहतूक सेवा पुरविणे या स्वरुपाच्या कामाची दरपत्रके मागवणेबाबत***" असा उल्लेख करावा. सोबत जोडलेल्या अटी व शर्तीनुसार मालवाहतूक सेवा पुरवणा-या पुरवठाकारांनी आपापली दरपत्रके सिलबंद स्वरुपात दिनांक 14.11.2025, दुपारी 4.00 वा. पर्यंत विद्यापीठात *उपकुलसचिव, वित्त विभाग, य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक 422 222* यांच्या नावाने खरेदी कक्षात सादर करावीत. दिनांक आणि वेळेनंतर प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**उपकुलसचिव**
**वित्त विभाग**

## विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्र यांच्यासाठी भाडेतत्त्वावरील मालवाहतूक सेवा पुरविणे करिता दरपत्रके मागविण्याबाबतच्या सूचना, अटी व शर्ती

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक हे विद्यापीठाच्या पुणे विभागीय केंद्रांसाठी भाडेतत्त्वावरील मालवाहूतक सेवा पुरवणेकरिता अशी सेवा पुरविणा-या मालवाहतूक पुरवठाकारांकडुन दरपत्रके मागवित आहे. विद्यापीठाच्या ycmou.digitaluniversity.ac या वेबसाईटवर सदरची दरपत्रके नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक हे गंगापूर धरणाजवळ महाराष्ट्र शासनाने कायदा क्र. २० (१९८९) अन्वये स्थापन केलेले आहे. या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र असून विद्यापीठाचे मुख्यालय ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक येथे आहे. **तसेच विद्यापीठाचे अमरावती, छ.संभाजीनगर, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, कोल्हापूर व नांदेड अशी आठ विभागीय केंद्रे आहे.** या विभागीय केंद्रांतर्गतच्या पुणे विभागीय केंद्रांतर्गत येणा-या विविध अभ्यासकेंद्रे/परीक्षा केंद्रे येथे विद्यापीठाचे साहित्य व अध्ययन साहित्य पोहोचवणे व आणणे तसेच ते मुख्यालयात (नाशिक) येथे पाठवणे. यासाठी भाडेतत्त्वावरील मालवाहतूक सेवा पुरविणे करिता दरपत्रके मागविण्यात येत आहे.

**सदरची दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे. यामध्ये पहिला लिफाफा हा तांत्रिक लिफाफा व दुसरा लिफाफा हा व्यावसायिक निविदेचा असेल.**

**(१) तांत्रिक लिफाफा**

**तांत्रिक लिफाफ्यामध्ये पुढीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.**

(1) मालवाहूतक सेवा पुरवणा-या सेवापुरवठाधारकाच्या फर्मची नोंदणी ही कंपनी एकमेव मालकी (Sole Proprietary Company), भागीदारी फर्म (Partnership Firm) किंवा कंपनी यांचे रजिस्ट्रारकडे/प्राधिकृत नोंदणी कार्यालयाकडे नोंदणीकृत असल्याबाबतचे प्रमाणपत्र. (कंपनी नोंदणी प्रमाणपत्र, दुकान कायदा नोंदणी प्रमाणपत्र किंवा आरटीओ नोंदणीची प्रत)

(2) मालवाहूतक सेवा पुरवणा-या सेवापुरवठाधारकाच्या पॅन कार्ड ची प्रत.

(3) मालवाहूतक सेवा पुरवणा-या सेवापुरवठाधारकाच्या जीएसटी नोंदणीच्या प्रमाणपत्राची प्रत.

(4) मालवाहूतक सेवा पुरवणा-या सेवापुरवठाधारकाने मागील तीन वर्षांचे (२०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५) जीएसटी भरल्याबाबतच्या चलनाची प्रत तसेच २०२५-२६ या वर्षासाठीची जीएसटी भरल्याबाबतची चलनाची प्रत (उपलब्ध असल्यास) जोडावी.

(5) मालवाहूतक सेवा पुरवणा-या सेवापुरवठाधारकाने मालकीची/कराराने/भाडे तत्त्वावर घेतलेल्या वाहनांची यादी, आरसी प्रती आणि लीज करार.

(6) मालवाहूतक सेवा पुरवणा-या सेवापुरवठाधारकाने विद्यापीठ, महाविद्यालये, सरकारी/निमसरकारी कार्यालये, सार्वजनिक कंपनी/संस्था यांना मालवाहतूक सेवा पुरविल्याबाबतच्या कार्यादेशाच्या प्रती/काम पूर्ण केल्याबाबतचे प्रमाणपत्र/अनुभवाचे प्रमाणपत्र, इ.

(7) प्रपत्र **१ व ३** मधील माहिती भरुन तांत्रिक लिफाफा **१** मध्ये जोडावी.

वरील 1 ते 7 कागदपत्रे तांत्रिक लिफाफ्यात सादर करणे आवश्यक आहे.

**(२) व्यावसायिक लिफाफा -**

मालवाहूतक सेवा पुरवणा-या सेवापुरवठाधारकाने व्यावसायिक लिफाफ्यामध्ये आपापले दर भरावेत. सदरचे दर प्रथम कार्यादेश दिल्याच्या दिनांकानंतर एक वर्षासाठी लागू राहतील. सदरचे दरांमध्ये सर्व सरकारी कर/जीएसटी/टोल

चार्जेस/पार्किंग चार्जेस याचा समावेश नसावा. टोल चार्जेस व पार्किंग चार्जेसच्या पावत्या प्रत्येक देयकासोबत जोडणे आवश्यक राहील.

**व्यावसायिक दरपत्रके (लिफाफा) उघडणे** : तांत्रिक लिफाफ्याच्या मूल्यांकनांत पात्र असलेल्या सेवापुरवठाकारांचे व्यावसायिक लिफाफे उघडण्यात येतील.

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार / मेक /वाहन क्रमांक | लोडिंग क्षमता | प्रति किमी दर (रु.) | किमान किमी (स्थानिक फेरीसाठी) | लोडिंग शुल्क (प्रति 100 किलो) | अनलोडिंग शुल्क (प्रति 100 किलो) |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (७) | (८) |
| 1 | | 1 ते 2 टन | | 80 | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| 2 | | 2.5 ते 3.5 टन | | 80 | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| 3 | | 4 ते 6 टन | | 80 | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

- **सेवापुरवठाधारकाने भरण्याची माहिती:** स्तंभ क्रमांक 2, 4, 7, आणि 8 मधील माहिती भरावी.
- **शुल्क** : लोडिंग/अनलोडिंग शुल्क प्रति टन, प्रति वाहन याप्रमाणे भरावेत. सेवापुरवठाकार फक्त वाहतूक किंवा लोडिंग/अनलोडिंग शुल्कासह वाहतुकीसाठी बोली देऊ शकतो.
- **किमी गणना:** विभागीय केंद्र ते गंतव्य स्थान आणि परत (एकूण किमी).
- **स्थानिक प्रवास** : विभागीय केंद्रापासून 80 किमी परीघ.
- सर्वात कमी दर सादर करणाऱ्या सेवापुरवठाकारास सदरची मालवाहतूक सेवा पुरविण्याचे काम दिले जाईल. सेवापुरवठाकाराने सर्व वाहनांचे दर भरणे अनिवार्य आहे.

**सेवापुरवठाकाराचा शिक्का आणि स्वाक्षरी**

**(३) दरपत्रके उघडणे**

**दरपत्रकांच्या वेळापत्रकानुसार प्रथम तांत्रिक लिफाफा उघडून सेवापुरवठाकाराने उपरोक्तप्रमाणे तांत्रिक लिफाफ्यात सादर केलेली सर्व कागदपत्रे विद्यापीठाच्या मान्य समितीद्वारे तपासण्यात येईल.**

**लिफाफा क्रमांक 1 – तांत्रिक लिफाफा (कागदपत्रे)**: सर्वप्रथम तांत्रिक लिफाफा उघडून सर्व कागदपत्रे विद्यापीठाच्या मान्य समितीद्वारे तपासण्यात येतील.

**लिफाफा क्रमांक 2 – व्यावसायिक लिफाफा** : तांत्रिक लिफाफा तपासल्यानंतर पात्र सेवापुरवठाकारांचे व्यावसायिक दराचा लिफाफा उघडण्यात येईल.

**(४) सुरक्षा ठेव (Security Deposit)**

1. ग्रशस्वी सेवापुरवठाकारास विद्यापीठाने निश्चित केलेली सुरक्षा ठेव रक्कम विद्यापीठाने दिलेल्या पेमेंट-लिंक वर जमा करावी लागेल.

2. काम पूर्ण झाल्यानंतर व तसा समाधानकारकरित्या काम केल्याचा अहवाल संबंधित विभागाकडुन प्राप्त झाल्यानंतर यशस्वी सेवापुरवठाकाराची सुरक्षा ठेव रक्कम परत करण्यात येईल.

3. यशस्वी सेवापुरवठाकाराच्या बाबतीत जर त्याने कार्यादेश मिळाल्यानंतर काम करण्यास नकार दिला किंवा वेळेत काम पूर्ण केले नाही तर सुरक्षा अनामत रक्क्म जप्त करण्यात येईल.

**(५) दरपत्रके स्वीकारणे**

कुलसचिव, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक यांना कोणतेही कारण न देता कोणत्याही किंवा सर्व सेवापुरवठाकारांची दरपत्रके स्वीकारण्याचा / नाकारण्याचा / रद्द करण्याचा अधिकार आहे.

**(६) वैधता कालावधी (Validity Period)**

सेवापुरवठाकाराने सादर केलेली दरपत्रके ही ६0 दिवसांसाठी वैध असतील. ग्रशस्वी सेवापुरवठाकाराचे व्यावसायिक लिफाफ्यातील दर पहिल्या कार्यादेशाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीसाठी वैध असेल.

**(७) धावत्या किमीची गणना (Count of Running k.m.)**

मालवाहतूकीच्या संदर्भात विभागीय केंद्रापासून ते गंतव्य ठिकाणापर्यंत आणि गंतव्य ठिकाणापासून विभागीय केंद्रांपर्यंत एकूण किलोमीटरची गणना करण्यात येईल. म्हणजेच पासून (fro) ते पर्यंत (to) अशी एकूण किलोमीटरची गणना करण्यात येईल.

परतीच्या प्रवासात आवश्यक असल्यास विद्यापीठाच्या मुख्यालय/अभ्यासकेंद्रे/परीक्षा केंद्रे येथून अध्ययन साहित्य/परीक्षा साहित्य/इतर साहित्य, इ. मुख्यालय/विभागीय केंद्रावर परत आणावे लागेल.

**(८) किमान किमी आणि वेळ (Calculation of Minimum k.m. and Time)**

मालवाहतूकची वेळ ही मालवाहूतक सेवा पुरवणा-या वाहनांनी विभागीय केंद्र परिसरात प्रवेश करते त्या क्षणापासून सुरू होईल.

(अ) **बाहेरगावची फेरी** - विभागीय केंद्र येथून बाहेरगावच्या फेरीसाठी नियमानुसार किमान २५० किमी प्रति दिन प्रमाणे शुल्क अदा करण्यात येईल. प्रत्यक्ष कमाल किमी किंवा किमान २५० किमी यापैकी जे अधिक असेल त्याप्रमाणे नियमानुसार शुल्क अदा करण्यात येईल.

(आ) **स्थानिक फेरी** - विभागीय केंद्र येथून 80 किमी अंतरावरील स्थानिक फेरीसाठी आठ तासांसाठी दररोज किमान शुल्क अदा करण्यात येईल. प्रत्यक्ष कमाल किमी किंवा किमान ८० किमी यापैकी जे अधिक असेल त्याप्रमाणे नियमानुसार शुल्क अदा करण्यात येईल.

**(९) स्थानिक वितरण (Vehicle for Local Delivery)**

स्थानिक फेरीसाठी (डिलिव्हरीसाठी) वापरल्या जाणाऱ्या वाहनासाठी विद्यापीठाने दिलेल्या किमान 80 किमी किंवा प्रत्यक्षात वाहन चालवले जाणारे अंतर यापैकी जे जास्त असेल ते गृहीत धरण्यात येईल व त्यानुसार देयक अदा करण्यात येईल.

**(१०) बिलांचे पेमेंट (Payment of Bill)**

मालवाहतूक सेवा पुरवणा-या पुरवठाकाराने आपापली देयके विभागीय केंद्रात सादर केल्यानंतर १५ दिवसांच्या आत अदा करण्यात येतील. त्यासाठी विद्यापीठाच्या विभागीय केंद्राचा समाधानकारक अहवाल, सर्व करांसहितचे देयके तसेच चलनाची प्रत आवश्यक असेल.

**(११) टोल आणि पार्किंग (Payment of Toll and Parking Charge)**

मालवाहतूक सेवा पुरवणा-या सेवापुरवठाकाराने टोल आणि पार्किंगच्या मूळ पावत्या देयकासोबत सादर केल्यास विद्यापीठ प्रत्यक्ष टोल आणि पार्किंग शुल्क देईल. टोल आणि पार्कींग शुल्काच्या छायांकित प्रतींना परवानगी दिली जाणार नाही.

**(१२) कामाचे तपशील (Information related to Actual Work to be performed by the Tenderer)**

मालवाहतूक सेवांसाठी, विद्यापीठाच्या विभागीय केंद्र यांनी निर्देशित केलेल्या इतर कोणत्याही ठिकाणाहून अध्ययन साहित्य किंवा इतर साहित्य उचलणे आणि विभागीय केंद्रांतर्गत येणा-या विविध अभ्यास केंद्रे/इतर केंद्रांवर वितरण करणे. तसेच त्या ठिकाणांहून साहित्य उचलणे आणि ते विभागीय केंद्रावर/विद्यापीठ मुख्यालयात पोहोचविणे.

**(१३) इतर अटी व शर्ती -**

1. सेवा पुरवठाकाराकडे सोपविलेली कामे संवेदनशिल गोपनिय व जोखमीचे आहेत, ते निर्धारित वेळेत पुर्ण करावयाची असतात त्यासाठी वाहन सुस्थितीत व सुरक्षित असावे, वाहनचालक सुजाण व निर्व्यसनी असावा.
2. वाहनासाठी नियुक्त केलेल्या चालकाची पोलीस पडताळणी झालेली कागदपत्रे विद्यापीठात जमा करणे आवश्यक आहे.
3. वाहनचालक यांचा पुरेसा विमा उतरविलेला असणे आवश्यक आहे.
4. पावसाळ्यात वाहनातील साहित्य भिजणार नाही याची काळजी व जबाबदारी पुरवठाधारकाने घेणे आवश्यक आहे.
5. मुळ देयक विभागीय कार्यालयास सादर करतांना देयकासोबत सुरुवातीचे व शेवटचे K.M. चे प्रमाणीत केलेले फोटो देणे आवश्यक आहे. त्याशिवाय देयक अदा करता येणार नाही.
6. सुरुवातीच्या व शेवटच्या KM ची गणना, करताना पुरवठाधारकाचे कार्यालय/ विभागीय कार्यालय हे निश्चित करावे.

7. देयकासोबत प्रमाणीत केलेल्या टोल पावत्या, व वजनाच्या मुळ काटा पावत्या देणे आवश्यक आहे.

8. प्रवासात वाहन नादुरुस्त झाल्यास साहित्य पोहचविण्यासाठी पर्यायी वाहन उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी सर्वस्वी पुरठाधारकाची राहिल.

9. वाहनासाठी लागणारे इंधन, टोल इ. खर्च हा आपल्याला करावा लागेल त्यासाठी कोणतीही आगाऊ रक्कम देण्यात येणार नाही.

10. वाहनाचे व वाहन चालकाचे शासकीय वैधानिक कागदपत्रे सोबत बाळगणे अनिवार्य आहे.

11. सेवा पुरवठाकारकाने अध्ययन साहित्य, परीक्षा साहित्य व इतर साहित्य वाहतूकीतील विलंबासाठी देयकाच्या रकमेच्या 1% प्रतिदिन इतका दंड आकारण्यात येईल.

12. वाहन वापर कालावधीतील कोणताही देखभाल दुरुस्ती खर्च विद्यापीठ देणार नाही.

13. विद्यापीठाकडून देयक अदा करतांना विद्यापीठाचे वेळोवेळी नियमात होणारे बदल व अटी आपणांस लागू राहतील.

14. वाहनास GPS Tracking असावा. व त्याचा ॲक्सेस संचालक, विभागीय केंद्र यांच्याकडे असेल.

15. वाहनाचा व वाहनचालकाचा रात्र थांब्याचा कोणताही खर्च विद्यापीठामार्फत अदा केला जाणार नाही.

16. वाहनचालकाचा अल्पोपहार, जेवण इ. ची जबाबदारी पुरवठाधारकाची राहील, त्यासाठी विद्यापीठ कोणताही भत्ता देणार नाही.

17. सेवापुरवठाकारास कार्यादेशातील सर्व अटीं व शर्तीनुसार काम करावे लागेल.

18. सेवापुरवठाकारास कार्यादेश प्राप्त झाल्यानंतर त्यास विद्यापीठासोबत 7 दिवसांत रु. 500 च्या स्टॅम्प पेपरवर करार करावा लागेल.

19. एक वर्षाच्या कालावधीनंतर संबंधित विभाग/केंद्र/कक्ष यांच्याकडुन समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यानंतर अतिरिक्त १ + १ अशा दोन वर्षांसाठी विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या मान्यतेनुसार मुदतवाढ देता येईल.

20. या दरपत्रकांसंदर्भात कुठलाही वाद उदभवल्यास सदरचा वाद हा नाशिक सिटी सिव्हिल कोर्ट या अधिकार क्षेत्रांत असेल.

## प्रपत्र -१

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## विभागीय केंद्रास भाडेतत्त्वावर मालवाहतूक सेवा पुरविणे

***To Supply of Vehicles on Hire Basis for Transportation of Material***
***( Books, Exam-Material, etc.)***

**दरपत्रक नोटीस (Enquiry No. 999)**

## तांत्रिक लिफाफ्यासोबतची माहिती

**(सदरची माहिती तांत्रिक लिफाफ्यात सादर करावी.)**

**सेवापुरवठाकाराचे नाव व पत्ता** : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**दूरध्वनी व मोबाईल क्रमांक** : ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**ई मेल आयडी** : ------------------------------------------------------------

**पॅन क्रमांक** : ------------------------------------------------------------

**G.S.T. क्रमांक** : ------------------------------------------------------------

**अनुभव** : **१. एकूण वर्ष :**------------------------------------------

**२. एकूण संस्था:-** ----------------------------------------

**(मालवाहूतक सेवा पुरविल्याच्या संस्था)**

सेवापुरवठाकाराचे नाव, सही व शिक्का

प्रपत्र -२

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## विभागीय केंद्रास भाडेतत्त्वावर मालवाहतूक सेवा पुरविणे

***To Supply of Vehicles on Hire Basis for Transportation of Material ( Books, Exam-Material, etc.)***

**दरपत्रक नोटीस (Enquiry No. 999)**

## व्यावसायिक दर

(सदरचे दर हे व्यावसायिक लिफाफ्यामध्ये भरुन सदरचा लिफाफा सिलबंद स्वरुपात सादर करावा)

सेवापुरवठाकाराने खालील तक्त्यात दर भरावे. (दरपत्रक मान्य झाल्यास या दरात बदल करता येणार नाही)

| अ. क्र. | वाहनाचा प्रकार / मेक / वाहन क्रमांक | लोडिंग क्षमता | प्रति किमी दर (रु.) | किमान किमी (स्थानिक फेरीसाठी) | लोडिंग शुल्क (प्रति 100 किलो) | अनलोडिंग शुल्क (प्रति 100 किलो) |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (७) | (८) |
| 1 | | 1 ते 2 टन | | 80 | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| 2 | | 2.5 ते 3.5 टन | | 80 | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| 3 | | 4 ते 6 टन | | 80 | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

- **सेवापुरवठाधारकाने भरण्याची माहिती:** स्तंभ क्रमांक 2, 4, 7, आणि 8 मधील माहिती भरावी.
- **शुल्क** : लोडिंग/अनलोडिंग शुल्क प्रति टन, प्रति वाहन याप्रमाणे भरावेत. सेवापुरवठाकार फक्त वाहतूक किंवा लोडिंग/अनलोडिंग शुल्कासह वाहतुकीसाठी बोली देऊ शकतो.
- **किमी गणना:** विभागीय केंद्र ते गंतव्य स्थान आणि परत (एकूण किमी).
- **स्थानिक प्रवास** : विभागीय केंद्रापासून 80 किमी परीघ.
- सर्वात कमी दर सादर करणाऱ्या सेवापुरवठाकारास सदरची मालवाहतूक सेवा पुरविण्याचे काम दिले जाईल. सेवापुरवठाकाराने सर्व वाहनांचे दर भरणे अनिवार्य आहे.

सेवापुरवठाकाराची सही व शिक्का

## प्रपत्र -३

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

## विद्यापीठास भाडेतत्त्वावर मालवाहतूक सेवा पुरविणे

***To Supply of Vehicles on Hire Basis for Transportation of Material***
***( Books, Exam-Material, etc.)***

**दरपत्रक नोटीस (Enquiry No. 999)**

# प्रमाणपत्र

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गोवर्धन नाशिक यांच्या उपरोक्त दरपत्रके नोटीस मधील सर्व् अटी व शर्ती मला मान्य आहेत. उपरोक्त प्रपत्र- २ मध्ये दर नमूद केलेले असून आमचे दर मंजूर झाल्यास सदरची विद्यापीठास भाडेतत्त्वावर मालवाहतूक सेवा पुरवण्याच्या कामाच्या त्या दरास आम्ही बांधिल आहोत. आमचे दरपत्रक अंतिम झाल्यास प्रपत्र- २ मध्ये नमूद केलेली रक्कम आम्हास मान्य राहील. विद्यापीठ नियमानुसार विद्यापीठास भाडेतत्त्वावर मालवाहतूक सेवा पुरवण्याच्या कामास आमची कोणतीही हरकत राहणार नाही.

नाव ..............................................................

पत्ता ..............................................................

..............................................................

मोबाईल नंबर ..............................................................

सेवापुरवठाकाराची सही व शिक्का